**प्रस्तावना:-** जो राष्ट्र आपला इतिहास विसरतो त्याच भवितव्य अंधारमय असते.यानुसार इतिहासाला खूप महत्त्व आहे इतिहास लिहिण्यासाठी साधनांचा वापर केला जातो इतिहासातील साधने हे लिखित अलिखित आणि मौखिक आहे. इतिहास लिहिताना ऐतिहासिक साधनांचा वापर करून वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्यासाठी राष्ट्रीय अभिलेखाचे महत्त्व आहे अभिलेख म्हणजे मानवाच्या प्रगतीच्या आलेख दर्शवणारी कागदपत्रे होय.पुराभिलेख विभाग म्हणजे पुरा म्हणजे जुने,अभिलेख म्हणजे कागदपत्रे होय म्हणजे ज्या ठिकाणी जुनी कागदपत्रे जतन करून सांभाळून ठेवली जातात त्याला पुराभिलेख विभाग असे म्हणतात.प्राचीन काळात लेखन कला अवगत नव्हती तरी आपल्या पूर्वजांनी एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराच्या रूपाने आपले ज्ञान विचार दिले. लेखन कला अवगत झाल्यानंतर त्यांच्या प्राथमिक अवस्थेत कोरीव काम करून अभिलेख तयार केले जात होते. उदाहरणार्थ वीरगळ, ताडपत्र, भूर्जपत्र, ताम्रपट,स्तंभ,चिन्ह,चित्रकला,शिल्पे,शिलालेख यावर लेखन केले गेले व प्राचीन इतिहास लिहितांना या साधनांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.सदर अभिलेख हे प्राचीन मानवी संस्कृती बद्दल लिखित स्वरूपाचे पुरावे देत असल्याने त्यांना संशोधन प्रक्रियेमध्ये अनन्यसाधारण महत्व आहे.पुराभिलेख विद्येमध्ये अशा प्रकारच्या पुराव्याधारित संशोधनाचा वापर केला जात असे.इतिहासात उपलब्ध पुराव्याचे चिकित्सक पूर्वक संशोधन करून भूतकाळात घडून गेलेल्या घटनांची मांडणी करून इतिहास लेखन केले जाते.अशा प्रकारचे इतिहासाची चिकित्सापूर्वक मांडणी करणाऱ्या पद्धतीला इतिहास लेखन असे म्हणतात आणि जो अश्या पद्धतीने इतिहास लेखन करतो त्याला संशोधक किंवा इतिहासकार असे म्हटले जाते.इतिहासकार भूतकाळाच्या कोणत्याही घटकांची निवड करून त्यानुसार साधने शोधून त्याची मांडणी ऐतिहासिक दृष्टिकोनातून करत असतो.अठराव्या शतकानंतर युरोपमध्ये तत्त्वज्ञान आणि विज्ञान या क्षेत्रामध्ये लक्षणीय प्रगती झाली.वैज्ञानिक प्रगतीच्या उपयोग करून सामाजिक आणि ऐतिहासिक वास्तवांच्याही इतिहास अभ्यास करणे शक्य आहे असा विचार विचारवंतांमध्ये सुरू झाला आणि युरोप अमेरिकेमध्ये इतिहास आणि इतिहास लेखन या विषयासंबंधी विचार मंथन झाले,आणि इतिहास लेखनामध्ये वस्तुनिष्ठतेला महत्त्व प्राप्त झाले.इतिहास लेखन शास्त्र विकसित होण्यात अनेक विचारवंताच्या हातभार आहे त्यात रेने देकार्त,हेगल,कार्ल मार्क्स,अल्मास लिओपोल्ड रांगे आदी होय.यांच्यानुसार इतिहासाच्या अभ्यास फक्त राजकीय घडामोडी,राजे,महान नेते आणि त्यानुसार राजकारण मुसद्दगिरी,युद्ध यांच्यावर केंद्रित न करता तत्कालीन सामाजिक, धार्मिक, आर्थिक, हवामान, व्यापार, तंत्रज्ञान, दळणवळण,संपर्काची साधने,समाजाची विभागणी यासारख्या विषयांच्या अभ्यास करणे ही महत्त्वाचे मानले जाऊ लागले व त्यामुळे आधुनिक इतिहास लेखनाची व्याप्ती सतत विस्तारत गेली,त्यात साहित्य,स्थापत्य,शिल्पकला, चित्रकला,संगीतकला,नृत्यकला,नाट्यकला यासारखे विविध विषयांचे स्वतंत्र इतिहास लिहिले जाऊ लागले आणि या इतिहास लेखनात साधनांचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.भारतातील ऐतिहासिक स्वरूपाचे सर्वाधिक प्राचीन लिखित साहित्य हे कोरीव लेखांच्या स्वरूपातील आहे,त्याची सुरुवात मौर्य सम्राट अशोकांच्या काळापासून

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

म्हणजे इसवीसन पूर्वी तिसऱ्या शतकापासून होते.सम्राट अशोकाचे कोरीव लेख हे दगडी स्तंभावर कोरलेले आहेत.इसवी सनाच्या पहिल्या शतकापासूनच धातूची नाणी,मूर्ती,शिल्पे,ताम्रपट इत्यादी वरील कोरीव लेख उपलब्ध होऊ लागतात त्यातून महत्त्वाची ऐतिहासिक माहिती मिळते.या सर्व प्रकारच्या कोरीव लेखांमुळे संबंधित राज्याच्या काळ,वंशावळ, राज्य विस्तार, तत्कालीन शासन व्यवस्था,महत्त्वाच्या राजकीय घडामोडी तत्कालीन सामाजिक रचना,हवामान, यासारख्या महत्त्वाच्या बाबींची माहिती मिळते.इतिहासाची साधनेही जपून ठेवली आहे म्हणूनच वर्तमान काळात वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्यासाठी आपल्याला भारतातील किंवा विदेशातील पुराभिलेखागारांची मदत घ्यावी लागते म्हणूनच संशोधन कार्यात इतिहास लेखन करत असताना अभिलेखागाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे.हा शोध निबंध प्रस्तुत करण्यामागे अभिलेखाकाराचा इतिहास,इतिहासाच्या अभ्यासाची साधने,अभिलेखागाराचे वर्गीकरण ,भारतातील पुराभिलेखागार,महाराष्ट्रातील पुराभिलेखागार, खाजगी पुराभिलेखागार यासंबंधी संक्षिप्त माहिती देण्यात आली आहे आणि इतिहास लेखनात पुराभिलेखागाराचे महत्त्व विशद केले आहे.

द.त.विचारे यांनी नमूद केल्याप्रमाणे ‘जी कागदपत्रे अंगीकृत कार्याचा संदर्भात आणि कार्याचा एक भाग म्हणून निर्माण होतात व ती काही काळ किंवा कायम स्वरूपी जपून ठेवावी लागतात त्यांना ‘अभिलेख’ असे म्हणतात.

रेकॉर्ड; एखादी घटना, घडामोडी, सद्यस्थिती याविषयीचा लिखित वृत्तांत म्हणजे अभिलेख होय. थोडक्यात ज्ञान संप्रेक्षणाचा मुख्य हेतू गृहीत धरून भूतकाळ अथवा वर्तमानकाळात घडलेल्या घटना अथवा उपक्रमाबाबत सर्वसमावेशक नोंदी ठेवून तयार केलेल्या दस्तऐवजाला अभिलेख असे म्हणतात.

**अभिलेखागाराची संकल्पना** व्युत्पत्ती अर्थ Archives मूळ शब्द मूळ ग्रीक शब्द ARKHEION

ARKEION= Public records from arkhe governement.OR “It is the place for keeping Government records or other historical records”

थोडक्यात सार्वजनिक किंवा खाजगी किंवा ज्या दस्ताऐवजांना संशोधनाच्या दृष्टीने मूळ साधनांच्या दर्जा दिला जातो.अशा साधनांच्या निवडीपासून जतन,संवर्धन आणि गरजूंना प्रतिप्राप्ती करून देण्याचे काम सतत ज्या ठिकाणी चालते अशा ठिकाणाला अथवा कार्यालयाला अभिलेखागार असे म्हणतात.उदा. भारताचे राष्ट्रीय अभिलेखागार मुंबई येथे आहे.

**अभिलेखागाराचा इतिहास**: जगात युरोपामध्ये ग्रीस आणि रोमन राज्यांच्या अस्तित्वापासून कागदपत्र लेखनाचा इतिहास अथेंस राजवटीत इसवी सन पूर्व 360 मध्ये “मदर ऑफ दि गोडस” यापासून मिळतो.भारतातही प्राचीन काळात जुने कागदपत्र सामावून ठेवण्याची उदाहरणे आपल्याला मिळतात.प्राचीन काळात लेखन कला अवगत नव्हती तरी आपल्या पूर्वजांनी एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराच्या रूपाने आपले ज्ञान विस्तार केले लेखन करा अवगत झाल्यानंतर चिन्हे, चित्रकला, कोरीवलेख, शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्रे, ताडपत्र, रेशमी कापड यावर

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

लिखाण केले.यावरील लिखाण इतिहासास उपयुक्त असल्यामुळे या लिखाणाचे संरक्षण करण्याच्या प्रयत्न कसोशीने केलेला दिसतो. कौटिल्याचे अर्थशास्त्र यात पुराभिलेखागार व अभिलेख व्यवस्थापन याविषयी माहिती दिली आहे तेथूनच भारतीय लेखागाराची सुरुवात झाली.मध्ययुगीन काळातील शुकनिती या ग्रंथातून अभिलेखागाराची माहिती मिळते. अबुल रज्जाक ने 1442 मध्ये विजयनगरला भेट दिली त्यावेळी 40 खांबाच्या हॉलमध्ये चिहालसूनन येथे अत्यंत प्रशस्त जागेत अभिलेख जतन करून ठेवलेले होते असा उल्लेख केला आहे.पीटर मुंडी 1667 मध्ये भारतात भेट दिली असता केलादि राज्यात रेकॉर्ड रूम पाहून त्तसेच पालमपत्रावरील अभिलेख व्यवस्थित जतन करून ठेवले आहे याचे कौतुक केले आहे.सम्राट अकबराने फतेपुर सिक्री येथे खास अभिलेखागारसाठी 48 फूट लांब 28 फूट रुंद अशी भव्य इमारत बांधली व न्यायनिवाडा करण्यासाठी त्याच्या वापर करत असे.अभिलेखाचा प्रमुख विश्वासातील अधिकारी असे.अकबराने आदेशच दिला होता की रोजच्या दरबारातील कोर्टातील आदेश लिहून ठेवावे ह्यातूनच ‘अकबरनामा’ या ग्रंथाची निर्मिती झाली.बादशाह जहागीर,बादशाह शहाजान यांनीही परंपरा ठेवली होती. ताजमहालाच्या निर्मितीच्या संदर्भात सुरुवातीपासून तर बांधकाम पूर्ण झाल्यानंतरचे सर्व दस्तावेज पुराभिलेखागारात सुरक्षित ठेवल्या आहेत ह्यात वास्तुविशारदाचे नकाशे,खर्चाचे तपशील सविस्तर दिले आहे.राजस्थानच्या बिकानेर येथे शिवाजी महाराज आग्रा येथे भेट दिली असता राजा मिर्झा जयसिंगाच्या वकिलाने 12 मे 1666 ते 15 ऑगस्ट 1666 रोजचे रिपोर्ट ठेवले आहे.हिंदुस्थानात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यावर फारसी,पर्शियन,अरबी,उर्दू,तुर्की आदी भाषेत लिखान होवू लागली. साधनांचे चार विभाग होय 1) फर्मान , दरबारी हुकूम कौलनामा सरकारी पत्रे.2) वाकीयांची किंवा सुभेदारांची लिहिलेली पत्रे 3)तवारिखा सारखी नंतर लिहिलेली टिपणे 4) नामे यासारखी चरित्रकारांनी आपल्या आश्रयदातांचे चरित्र या प्रकारची कागदपत्रे शाही दप्तर असे ती कागद रुमालात बांधून खाली व वर लाकडी फळ्या असत त्यांना बस्ता म्हणत असत.हा दप्तरखाना वजीराचा ताब्यात असे.हा दप्तरखाना राजधानी राज निवासा जवळ असे यात फारसी फर्मान, कौल,मजहर,तवारीखा,वृत्त टिपणे सनदा,जाहीरनामे,चरित्रे यांच्या भरणा असे.शिवाजी महाराजांनीही अभिलेखाकाराचे महत्त्व समजले होते म्हणून रायगडावरच दप्तर खाण्यासाठी स्वतंत्र इमारत बांधली होती.इंग्रजी अंमल भारतात सुरू झाल्यापासून त्यांनी भारताची प्रांत वार विभागणी केली व त्यांना इलाका नाव दिले.मुंबई,मद्रास,बंगाल यासारखे इलाके अस्तित्वात आले.पुढे त्याचे रूपांतर राजधानीत झाले व तेथे दप्तरखाना सुरू झाला.हिंदुस्थानात इंग्रजांची राजधानी सुरुवातीला कलकत्ता होती तेथे इम्पिरियल रेकॉर्ड ऑफिस ची स्थापना इ. स.1891 मध्ये केली.या दप्तर खाण्याचे पहिले प्रमुख डॉ. जी.डब्ल्यू. फॉरेस्ट होते.त्यानंतर अशाच प्रकारचे दप्तर मुंबई,मद्रास,नागपूर,लाहोर,अलाहाबाद,पटना,कलकत्ता,कटक,श्रीनगर आदि राजधानीत सुरू झाले. आजही राज्य दप्तरखाने प्रत्येक राज्य शासनाच्या राजधानी तर त्या राज्य सरकारची दप्तरे सांभाळण्याचे काम करीत आहे.

**इतिहासाच्या अभ्यासाची साधने** : इतिहास लेखन करताना साधनांचे खूप महत्त्व असते. साधनांचे

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

लिखित, अलिखित आणि मौखिक असे वर्गीकरण केले जाते. लिखित साधनात शिलालेख, तांम्रपट, कागदपत्रे, तवारिखा, बखरी, वंशावळी मआसिर, शकवल्या यांच्या समावेश होतो तर अलिखित साधनात पुरातत्वीय वस्तू, भांडी, शिल्पे, चित्रे, आयुध, वास्तू स्मारके यांच्या समावेश होतो तर मौखिक साधनात कथा,अभंग,पोवाडे,लोकगीते,लोककथा आदींचा समावेश होतो. प्राचीन काळात लेखन कला अवगत नव्हती तरी आपल्या पूर्वजांनी एका पेटवून दुसऱ्या पिढीकडे पाठांतराच्या रूपाने आपले ज्ञान विचार दिले.इतिहास लेखनासाठी साधनांचे खूप महत्त्व आहे त्याच्या वापर वस्तुनिष्ठतेने केले पाहिजे. मार्क्सचा मते इतिहास हा विज्ञाननिष्ठ लिहिला जातो त्यासाठी साधने व सत्याची कास असणे आवश्यक आहे. इतिहास हा तेव्हाच वस्तुनिष्ठ लिहिला जाईल जेव्हा इतिहासकार हा जास्तीत जास्त साधनांच्या वापर करेल. आजपर्यंतच्या इतिहासात जाणून घ्यायचा असेल तर भारतातील अभिलेखागारात उपलब्ध असलेल्या साधनांच्या वापर करावा लागतो म्हणूनच म्हटले जाते की (No Documents No History) भारतात अनेक अभिलेखागार आहेत त्यात आजगायात राजकीय,प्रशासकीय,आर्थिक,धार्मिक,शैक्षणिक,भूमी संबंधी अनेक भाषेत आपल्याला कागदपत्र उपलब्ध आहेत.आशियाई खंडातील सर्वात मोठा दप्तरखाना मुंबई अभिलेखागार असून तेथे 46 देशांच्या इतिहास सांगणारी अस्सल कागदपत्रे जतन करून ठेवलेली आहे,म्हणून इतिहास लिहिताना साधनांचे खूप महत्त्व आहे. त्याचबरोबर अभिलेखागाराची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

**अभिलेखागाराचे वर्गीकरण**:- शैक्षणिक संग्रहालय ,व्यवसायिक संग्रहालय, शासकीय संग्रहालय, चर्च संग्रहालय, फिल्म संग्रहालय इंटरनेट आर्किव्ह्ज, सार्वजनिक अभिलेखागार, खाजगी अभिलेखागार, मौखिक संग्रहालय,ध्वनि संग्रहालय होय.

**भारतातील अभिलेखागार:** भारतात मद्रास, बंगाल, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, आसाम, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, राजस्थान, जम्मू,काश्मीर येथे असून अभिलेखागार भव्य इमारत असून संशोधकाना सर्व प्रकारच्या सोयी उपलब्ध करून देण्यात येतात.अभिलेखागारा मध्ये प्राथमिक साधने,ऐतिहासिक साधने,समकालीन साधने विश्वसनीय ठरते म्हणूनच अवल दर्जाचे किंवा प्राथमिक दर्जाच्या पुरावा म्हणून त्याच्या उल्लेख होतो.

**महाराष्ट्रातील अभिलेखागार**:- मुंबई पुराभिलेखागाराची स्थापना 1821 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात झाली संचालनाचे मुख्य कार्यालय मुंबई असून पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद येथे विभागीय कार्यालय आहे. आतापर्यंत प्रसिद्ध झालेले राज्य पत्रे, वर्तमानपत्रे, दैनंदिनी, मोडी कागदपत्रे जतन करून ठेवण्यात आलेली आहे.धुळे येथे वि.का.राजवाडे तसेच समर्थ वागदेवता आहे. प्राचीन संस्कृतीच्या इतिहास लिहिण्यासाठी पुरातत्वीय साधनांच्या वापर केला जातो. अभिलेखानाच्या अभ्यासाला पुराभिलेखागार विद्या असे म्हणतात. हडप्पा संस्कृती पासून आपल्याला अभिलेख मिळालेले आहेत पण ते अजूनही वाजता आलेले नाहीत. सर्वात प्राचीन अभिलेख सम्राट अशोकाचे असून ब्राह्मि व खगोष्टी लिपीत आहेत.देशात सर्वात प्राचीन लेख म्हणजे इ.स. पूर्व शतकातील सम्राट

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – VI (Special Issues -I ) Nov – Dec 2023

OPEN ACCESS Original Research Article

अशोकाचे असून इ.स. 1837 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारी जेम्स प्रिन्सेस यांनी सम्राट अशोकाच्या आलेखातील ब्राह्मी लिपीचे स्पष्टपणे वाचन करून भारतीय इतिहासाचे नवीन दालनअभ्यासकांना खुले केले आहे.

**अभिलेखागारातील कागदपत्रे** :- महाराष्ट्रातील मुंबई येथील अभिलेखागारात वेगवेगळ्या विभागाचे 1820 पूर्व अभिलेख,डायरी,जावक पत्रव्यवहार, आवक पत्र व्यवहार, ठराव,नोंदवहया, संशोधन उपयोगी इतिहासाची पुस्तके, ऐतिहासिक संदर्भात साधने,मुंबई पुराभिलेखागारात आहेत.शासकीय पुस्तकांमध्ये आर्मी रिपोर्ट अबकारी ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई इलाख्यातील न्यायव्यवस्था,दिवाणी प्रशासकीय अहवाल, मुंबईच्या पाणीपुरवठा,मुंबईची आर्थिक परिस्थिती,फौजदारी व दिवाणी कायदे, जंगल खात्यातील नियम व कायदे, ब्रिटिश कोड लिस्ट, लोकराज्य, विविध जिल्ह्यातील गॅझेटीयर, जनगणना, अहवाल, विविध वर्तमानपत्र आदि रिपोर्ट आहेत. या व्यतिरिक्त खाजगी दप्तरखाने पण आहेत.भारत इतिहास संशोधन मंडळ पुणे या संस्थेची स्थापना वि.का. राजवाडे यांनी स्वतः गावे गावी फिरून ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करण्याचे काम हाती घेतले व काम करीत असताना ऐतिहासिक कागदांच्या नकला करणे केलेल्या नकला रुजू पाहणे, तारखा घालणे वगैरे कामे का चालूच असत.निरनिराळ्या गावी जाऊन ऐतिहासिक व्यक्तीस भेटून त्यांच्याकडून इतिहासकालीन प्रसंग, व्यक्ती, काल त्यांच्या इतिहास, वंशावळी यासारखे लाखोच्या वरती ऐतिहासिक कागदपत्रे मंडळाचा मिळवून अनेक वर्षांच्या इतिहास लिहिण्यास उपयुक्त साधने त्यांनी जमविली आहेत.इतिहासाचे संशोधन करणारे विद्यार्थी या संस्थेचे जाऊन ऐतिहासिक कागदपत्रांचे संशोधन करीत असता असतात.धुळे येथील वि.का.राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना झाली डिसेंबर 1926 मध्ये इतिहासाचार्य राजवाडा यांचे निधन झाल्यानंतर जानेवारी 1927 मध्ये त्यांनी बहुमोल संग्रह केलेल्या कागदपत्रांसाठी सुसज्ज इमारतीचे बांधकामास सुरुवात केली व ती 1933 मध्ये पूर्ण झाली,त्यात लोखंडी कपाट असून हस्तलिखित कागदांच्या सूची तयार करून ते कागदपत्र संशोधनास उपलब्ध होतील अशा तऱ्हेने ठेवलेले आहेत.मंडळाचे आतापर्यंत ऐतिहासिक स्वरूपाचे सुमारे वीस ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत शिवाय या मंडळाचे त्रैमासिक वर्तमान काळातील सुरू आहेत.

**निष्कर्ष:**

इतिहास लेखनात संदर्भ साधने खूप महत्त्वाची असतात.संदर्भ साधनांशिवाय लिहिलेला इतिहास हा इतिहास नसून तो कथा-कादंबरी किंवा अर्थहीन समजला जातो.इतिहास हे शास्त्र असून ते शास्त्रात पुराव्याशिवाय कोणतेही बाब सिद्ध करता येत नाही तसेच इतिहास आहे.साधन इतिहासाचा आत्मा आहे. प्राथमिक साधने किंवा संदर्भ साधने इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत.प्राथमिक किंवा साधनांशिवाय इतिहास लिहिला जाऊ शकत नाही.जगात प्राचीन काळापासून अभिलेखागाराचे महत्व आहे. अभिलेखागारांमध्ये अनेक प्रकारचे इतिहासाला उपयुक्त असणारे साधनसामग्री अतिशय सुव्यवस्थेत जतन करून ठेवलेली आहेत आजही अनेक कागजपत्र अप्रकाशित असून त्यात भारताच्या किंवा जगाच्या इतिहास शोधून काढण्यासाठी आपल्याला संशोधकांची खूप खूप गरज आहे.अभिलेखागारात अनेक भाषेत कागदपत्रे असून त्या

भाषेचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी ही महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे.मोडी भाषेत अनेक कागदपत्रे असून संशोधकांसाठी उपलब्ध करून दिलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

खोबरेकर विठ्ठल गोपाल,(1988),महाराष्ट्रातील दप्तर खाने वर्णन आणि तंत्र,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई.

https://navjyot.net/wp-content/uploads/2019/09/12-Navjyot-Dec.pdf

https://mr.wikipedia.org

http://www.maharashtra-archives.org/Record-Act.pdf

*Cite this Article:*

Dr. Varma M.J. (2023). ***इतिहास लेखनात अभिलेखागाराचे महत्व,*** In Electronic International Interdisciplinary Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 324–330). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10464642